## पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
## नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक 16/03/2020 (सोमवार)
## (सकाळ)

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस अटक

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 4 कि. मी. अंतरावर घोराड येथे दि. 14/03/2020 चे 19.30 वा. दरम्यान अल्पयवीन 16 वर्षीय फिर्यादी/पीडित हीच्या राहत्या घरी शेतातील विहीरी जवळ हात धुवत असतांना आरोपी नामे– बलदेवसिंग लखनसिंग पंधराम, वय 27 वर्ष, रा. मल्हारी बकुल मोहखेड जि. छिंदवाडा याने तिच्या जवळ येवुन 'माझ्या सोबत चालत आहे किंवा नाही' असे म्हटले त्यावर पीडितेने मनाई केली असता, आरोपीने दोन्ही हातांनी पीडितेची मान व 2 पायाजवळ पकडुन, तिचा विनयभंग केला. तसेच आरोपीने पीडितेला उचलुन पाणी असलेल्या खोल विहरीत फेकुन जिवानिशी ठार मारण्याचा प्रयत्न केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 307, 354, 354 ड भादवी सहकलम 12 बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. नमुद गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलिस निरीक्षक चवरे 9867672244 हे करीत आहेत.

### विनयभंग

पो.स्टे. खापरखेडा :– दिनांक 14/03/2020 चे 20.00 वा. दरम्यान 17 वर्षीय फिर्यादी/पीडित हि नांदा शिवारातील अर्धनारी नटेश्वर घटाच्या मागे किल्ले कोलार येथे तिच्या काकाचे जेवणाचा डब्बा घेवून गेली असतांना आरोपी नामे– अमित कुमार त्रिपाठी याने तिला अश्लिल शब्दात बोलुन तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. तसेच आरोपीने दिनांक 15/03/2020 राजी मोबाईल वरून कॉल करून तिला पाहुन घण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 354(ड), 506, भादंवी. सहकलम 11, (1)12 बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि धुमाळ हे करीत आहे.

## गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 4 कि.मी अंतरावर पांडे लेआउट नांदा येथे दिनांक 15/03/2020 चे 11.00 वा ते 11.30 वा. दरम्यान आरोपी नामे 1) अमीत ब्रिज बिहारी सिंग, 2, मूजम्मीर सिध्दकी 3,ब्रिजविहारींसींग, 4,सौ, रिना सिग 5,सुमीत सिंग 6, कु, ज्योति सिंग यांनी जुन्या भांडणाचे कारणावरून संगनमत करून गैरकायद्याची मंडळी गोळा करून प्राणघातक हल्ला करण्याचे उद्देशाने लाकडी काठया व विटाने फिर्यादी नामे– सौ, कविता दुर्गाप्रसाद तिवारी वय 50 वर्श व त्यांच्या मुलावर हमला करून फिर्यादी चे डोक्याला लाकडी काठया व विटानी मारहाण करून जखमी केले व फिर्यादीच्या मुलाला किरकोळ जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम 324, 323, 143, 147, 149 भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सूरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार श्री. गुरूप्रकाश मेश्राम 9823453169 हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. कन्हान – दिनांक 14/03/2020 चे 17.30 वा. ते 18.00 वा. चे सुमारास पो.स्टे. कन्हान हद्दीत फिर्यादी यांची 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक श्री महादेव सुरजुसे 7666640218 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर